SUCCESS KEY TEST SERIES

इयत्ता

10

भूगोल

सेमी-इंग्लिश व मराठी माध्यम

(महाराष्ट्र राज्य मंडळ)

नोट्स

- प्रकरणनिहाय संपूर्ण नोट्स
- महत्त्वाचे मुद्दे
- नकाशे व आकृत्या
- तक्ते व तुलनात्मक माहिती
- परीक्षाभिमुख मांडणी

www.successkey.org | Whatsapp: 9503748132

Success Key Test Series

इयत्ता : १० वी (महाराष्ट्र बोर्ड)

विषय : भूगोल

धडा 1

क्षेत्रभेट

1. अध्याय परिचय

क्षेत्रभेट म्हणजे प्रत्यक्ष स्थळी जाऊन तेथील भौगोलिक, सामाजिक व आर्थिक घटकांचे निरीक्षण करून माहिती संकलित करण्याची प्रक्रिया होय, क्षेत्रभेटीमुळे पाठ्यपुस्तकातील ज्ञानाचा प्रत्यक्ष अनुभव मिळतो.

2. व्याख्या

क्षेत्रभेट :

एखाद्या प्रदेशाला प्रत्यक्ष भेट देऊन तेथील नैसर्गिक व मानवनिर्मित घटकांचे निरीक्षण, नोंद व अभ्यास करण्याच्या प्रक्रियेला क्षेत्रभेट म्हणतात.

3. क्षेत्रभेटीची आवश्यकता

- प्रत्यक्ष निरीक्षणातून ज्ञान मिळते.
- भौगोलिक घटक समजण्यास मदत होते.
- नकाशावाचन व दिशाज्ञान विकसित होते.
- निरीक्षण, नोंद व विश्लेषण कौशल्य वाढते.
- पर्यावरणाबद्दल जागरूकता निर्माण होते.
- समूहकार्य व नियोजनाची सवय लागते.




4. क्षेत्रभेटीची उद्दिष्टे

- प्रदेशातील भूरचना समजून घेणे.
- मृदा, वनस्पती, शेती यांचे निरीक्षण करणे.
- जलाशय व नद्यांचा उपयोग समजून घेणे.
- मानवी वस्ती व घरांचे प्रकार पाहणे.
- प्रदेशानुसार होणारे भौगोलिक बदल ओळखणे.
- साहिती गोळा करून अहवाल तयार करणे.



6. क्षेत्रभेटीचे नियोजन (Flow Chart)



8. क्षेत्रभेटीचा मार्ग (नकाशा)



5. क्षेत्रभेटीसाठी आवश्यक साहित्य



7. क्षेत्रभेटीत निरीक्षण करावयाच्या बाबी

निरीक्षण	काय पाहावे?
भूरचना	डोंगर, पठार, मैदान, उतार इत्यादी
जलाशय	नदी, धरण, तलाव, कालवे इत्यादी
वनस्पती	झाडे, गवत, जंगल, वनप्रकार इत्यादी
शेती	पिकांचे प्रकार, सिंचनाची साधने
मृदा	मृदेचा रंग, प्रकार, सुपीकता
मानवी वस्ती	घरांचे प्रकार, वस्तीचा आकृतिबंध, उपलब्ध सुविधा

9. परीक्षा दृष्टीने महत्त्वाचे मुद्दे

- ★ क्षेत्रभेट = प्रत्यक्ष अध्ययन.
- ★ निरीक्षण व नोंदी हे क्षेत्रभेटीचे मुख्य घटक आहेत.
- ★ क्षेत्रभेटीपूर्वी योग्य नियोजन करणे आवश्यक आहे.
- ★ नकाशा, प्रश्नावली व आवश्यक साहित्य सोबत असावे.
- ★ क्षेत्रभेटीनंतर गोळा केलेली माहिती व्यवस्थित करून अहवाल तयार करावा.

Success Key Test Series

इयत्ता : १० वी (महाराष्ट्र बोर्ड)

विषय : भूगोल

धडा 1

क्षेत्रभेट

1. क्षेत्रभेटीदरम्यान दिसणारे भौगोलिक बदल

निरीक्षण	क्षेत्रभेटीत दिसणारे बदल
भूरचना	पठार → डोंगराळ प्रदेश → किनारपट्टी
वनस्पती	काटेरी → पानझडी → दाट वनराई
शेती	कडधान्ये → ऊस → भात → नारळ, पोफळी
मूदा	प्रदेशानुसार बदल
हवामान	कोरडे → दमट
वस्ती	ग्रामीण → शहरी → किनारी वस्ती

2. क्षेत्रभेटीत अभ्यासलेली महत्त्वाची स्थळे

स्थळ	अभ्यासाचा मुद्दा
1 नळदुर्ग	कोरडा प्रदेश, कडधान्ये
2 सोलापूर	शहरी वस्ती, वाहतूक, बाजारपेठ
3 उजनी धरण	जलाशय, सिंचन, पिण्यांचे पाणी, मासेमारी, विद्युतनिर्मिती
4 सिंहगड	डोंगरी किल्ला, सह्याद्री, बेसाल्ट खडक
5 राजमाची	सह्याद्रीचा उतार, घाटमार्ग
6 अलिबाग	किनारपट्टी, जलदुर्ग, मासेमारी, नारळ–पोफळी

3. किल्ल्यांचे प्रकार (तुलना)

भुईकोट	डोंगरी	जलदुर्ग
सपाट जमिनीवर बांधलेला किल्ला.	डोंगराच्या माथ्यावर बांधलेला किल्ला.	समुद्रात किंवा पाण्याने वेढलेल्या ठिकाणी बांधलेला किल्ला.
		
उदाहरण : नळदुर्ग	उदाहरण : सिंहगड	उदाहरण : कुलाबा किल्ला

4. क्षेत्रभेटीत दिसणारे प्रमुख भौगोलिक घटक


उजनी धरण


खडकवासला जलाशय


सह्याद्री पर्वतरांग


बोरघाट (खंडाळा घाट)


अरबी समुद्र


देवराई

5. प्रदेशानुसार शेतीतील बदल

प्रदेश	प्रमुख पीक	
नळदुर्ग परिसर	मूग, उडीद, इत्तर कडधान्ये	
सोलापूर – पुणे परिसर	ऊस	
सिंहगड परिसर	भात	
अलिबाग परिसर	नारळ, पोफळी (सुपारी), फणस, केळी	

6. क्षेत्रभेटीतील प्रमुख व्यवसाय


शेती


मासेमारी


पर्यटन


बागायती शेती

7. क्षेत्रभेटीदरम्यान घ्यावयाची काळजी

- शिक्षकांच्या सूचनांचे पालन करावे.
- पर्यावरण स्वच्छ ठेवावे. कचरा योग्य ठिकाणी टाकावा.
- धोकादायक ठिकाणी जाऊ नये.
- समुद्रकिनारी भरती–ओहोटीची माहिती घ्यावी.
- रस्त्यावर वाहतुकीच्या नियमांचे पालन करावे.
- आवश्यक साहित्य जवळ ठेवावे व हरवू देऊ नये.
- घटनास्थळी शिस्त व समूहभावना राखावी.



8. प्रकल्प कार्य – क्षेत्रभेट अहवाल (Format)

- क्षेत्रभेटीचे ठिकाण : _____
- दिनांक : _____
- उद्दिष्ट : _____
- पाहिलेली स्थळे : _____
- निरीक्षणे : _____
- छायाचित्रे : (चिटकवावीत / काढावीत)
- निष्कर्ष : _____



9. कारखाना / कार्यालय भेटीसाठी प्रश्नावली



- येथे कोणते काम केले जाते?
- किती कर्मचारी कार्यरत आहेत?
- कच्चा माल कोणता वापरला जातो?
- तयार होणारे उत्पादन कोणते?
- पाण्याचा वापर कसा केला जातो?
- पर्यावरण संरक्षणासाठी कोणते उपाय केले आहेत?

10. नावे सांगा

- भीमा नदीवरील धरण – उजनी
- सिंहगडजवळील जलाशय – खडकवासला
- पश्चिमेकडे वाहणारी प्रमुख नदी – उल्हास
- समुद्र – अरबी समुद्र
- जलदुर्गांचे उदाहरण – कुलाबा किल्ला

11. व्याख्या

- **देवराई** : धार्मिक श्रद्धेमुळे जतन केलेला वनाचा भाग.
- **जलदुर्ग** : समुद्रात किंवा पाण्याने वेढलेल्या ठिकाणी बांधलेला किल्ला.
- **क्षेत्रभेट अहवाल** : क्षेत्रभेटीदरम्यान केलेल्या निरीक्षणांची क्रमवार लेखी नोंद.

12. परीक्षा दृष्टीने महत्त्वाचे मुद्दे

★ प्रदेशानुसार भूरचना, हवामान, वनस्पती व शेतीमध्ये बदल होतात.

★ उजनी धरणाचे पाणी पिण्यास, सिंचन, मासेमारी व विद्युतनिर्मितीस उपयोगी पडते.

★ सिंहगड हा डोंगरी किल्ला, नळदुर्ग भुईकोट, तर कुलाबा जलदुर्ग आहे.

★ समुद्रकिनारी भरती–ओहोटीची माहिती आवश्यक असते.

★ क्षेत्रभेटीनंतर अहवाल तयार करावा.

